नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १३६ | Issue - 136 | वार बुधवार दि. २ ऑक्टोबर २०२४ | Blow- Wednesday Date 2 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### नायर रुग्णालय प्रकरणी मुख्यमंत्र्यांचे कारवाईचे आदेश



मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील लैंगिक छळाच्या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी कठोर कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले असून पीडितांना न्याय मिळवून देण्याची खात्री दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना रुग्णालयाच्या डीनची तात्काळ बदली करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी एका विशेष समितीची स्थापना करण्यात येणार आहे. रुग्णालयातील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अतिरिक्त उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

# २०२९ मध्ये महाराष्ट्रात भाजपचे सरकार आणू

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे वक्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी निराशेला गाडून कामाला लागायला हवे. महाराष्ट्रात २०२४ला महायुतीचे सरकार येईल ही काळ्या दगडावरची रेघ आहे,' असा दावा पक्षाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केला. 'सन २०२९मध्ये केवळ भाजपच्याच जिवावर महाराष्ट्रात सरकार आणू. त्या वेळी एकट्या कमळाचे सरकार असेल,' असेही ते म्हणाले. 'भपकेबाजपणाने निवडणूक जिंकता येत नाही,' असेही त्यांनी देखावा करणारे आमदार आणि नेत्यांना खडसावले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दादरमधील स्वामिनारायण मंदिरातील योगी सभागृहात शहा यांच्या उपस्थितीत भाजपचा संवाद मेळावा पार पडला. 'शक्ती कार्यकर्त्यांची-प्रचिती आत्मविश्वासाची' असे घोषवाक्य घेऊन भाजपने ठिकठिकाणी



मेळावे आयोजित केले आहेत. मुंबईतील मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आलेले शहा मुंबई, ठाणे आणि कोकणातील मतदारसंघांचा आढावा घेणार आहेत.

'मतभेद विसरून काम करा,' असे आवाहन करून शहा म्हणाले, 'लोकसभेत दोन जागा आल्या तेव्हा कुणीही पक्ष सोडून गेले नव्हते. आताही राज्यात महायुतीच सरकार स्थापन करील. महाराष्ट्राची निवडणूक देशाची दशा आणि दिशा बदलणारी आहे. ६० वर्षांत महाराष्ट्रात सलग तीनदा एकही पक्ष निवडणूक जिंकलेला नाही. आपण महान भारताच्या रचनेसाठी राजकारणात आलो आहोत.' 'राहुल गांधी आणि विरोधी पक्षाचे राजकारण म्हणजे मूर्खपणा आहे,' अशी टीका शहा यांनी या वेळी केली.

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचा सल्ला देऊन पक्षांतर्गत वादांबाबत शहा म्हणाले, 'प्रत्येक घरात वाद असतातच, मात्र हे वाद आणि मतभेद निवडणुकीपूर्वी दूर करा. काहींना कामे करायची नसतात; पण खरा कार्यकर्ता काम करताना विचार करीत नाही. जे काम करतात तेच निवडणूक जिंकतात. निराशा झटकून टाका, कुणीही सर्वेक्षणांचा विचार करू नका. राज्यात भाजपचे सरकार येईल त्यासाठी जोमात आणि शुद्धीत राहून काम करा.'

या संवाद मेळाव्यास अमित शहांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव, केंद्रीय सहसंघटन मंत्री व्ही. सतीश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, निवडणूक संचालन समिती प्रमुख रावसाहेब दानवे, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, मुंबईतील कोअर कमिटीचे सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्यात महायुतीला रोखण्याची ताकद कुठल्याही पक्षात नाही. आपल्याविरुद्ध आपल्या नगरसेवक, आमदार आणि खासदारांच्या विरोधात जनतेत असलेली नाराजी दूर करा. प्रत्येक निवडणूक बूथवर आपल्याला १० कार्यकर्ते पाहिजेत. दसऱ्यापासून प्रचार संपेपर्यंत हे कार्यकर्ते त्यांच्या बूथच्या कक्षेत फिरत राहतील. या कार्यकर्त्यांनी आपली विचारसरणी असलेल्या मतदारांना मतदानासाठी उतरवावे. प्रत्येक बूथवर किमान २० लोकांना भाजपचे सदस्य करा. सदस्य करताना मत मागू नका. सदस्य झाल्यावर त्यांना आपसूक मतदानाचे महत्त्व कळेल, अशा शब्दांत शहा यांनी कार्यकर्त्यांना कानमंत्र दिला.

दरम्यान, या मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील कार्यकर्त्यांना सूचना केल्या. 'अतिविश्वास ठेवू नका आणि गाफील राहू नका,' असा कानमंत्र देवेंद्र फडणवीस यांनी दिला. 'आपले विरोधक एकत्रित आले आहेत. ते कुठलीही तडजोड करायला तयार आहेत. सरकारने केलेल्या कामांमुळे लोक आपल्यासोबत आहेत. ३ कोटींहून अधिक लाभार्थी सरकारचे आहेत. त्यांची मते मिळाली तरी सरकार पुन्हा येईल,' असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला.

## जग्गी वासुदेव यांच्या आश्रमाची झडती; मद्रास उच्च न्यायालयाच्या ताशेऱ्यांनंतर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई /कोयंबतूर : 'सद्गुरू' जग्गी वासुदेव यांच्या 'ईशा फाऊंडेशन'च्या कोयंबतूर येथील आश्रमाची पोलिसांनी मंगळवारी झडती घेतली. एका व्यक्तीने आपल्या दोन मुलींना आश्रमात डांबून ठेवल्याचा आरोप करत मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत फाऊंडेशनविरोधात दाखल सर्व गुन्ह्यांचा तपशील सादर करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. एस. कामराज नामक व्यक्तीने उच्च न्यायालयात 'हेबियस कॉर्पस' याचिका दाखल करून ईशा फाऊंडेशनवर गंभीर आरोप केले आहेत. आपल्या दोन मुली गीता कामराज ऊर्फ माँ माथी (४२) आणि लता कामराज ऊर्फ माँ मायू (३९) यांना आश्रमात कोंडून ठेवण्यात आले असून त्यांना संन्यास घेण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. सोमवारी यावर झालेल्या सुनावणीत मद्रास उच्च न्यायालयाने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले होते व राज्य सरकारला संबंधित माहिती सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर मंगळवारी सुमारे १५० पोलिसांनी कोयंबतूर येथील ईशा योग केंद्रामध्ये झडती घेतली. मात्र केंद्राने ही झडती नसून केवळ चौकशीसाठी पोलीस आल्याचा दावा केला. केंद्रातील रहिवासी आणि स्वयंसेवकांची माहिती, त्यांची जीवनशैली, ते येथे कसे आले आदीबाबत माहिती घेण्यात आल्याचे संस्थेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. सोमवारच्या सुनावणीदरम्यान गीता




आणि लता कामराज या दोघीही हजर होत्या. आपल्या मुलींना बळजबरीने आश्रमात ठेवल्याचे सांगितल्यानंतर या दोघींनीही आपण स्वत:हून तेथे राहात असल्याचे न्यायालयाला सांगितले. मात्र आपल्या उच्चशिक्षित मुलींना प्रभावित करून त्यांचे 'ब्रेनवॉश' करण्यात आल्याचा आरोप कामराज यांनी केला. त्यानंतर काही जणांना डांबून ठेवल्याचा आणि नातलगांना भेटू देत नसल्याचा आरोप केला असून संस्थेमधील परिस्थितीवर मोठ्या प्रमाणात आक्षेप घेण्यात आल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. फाऊंडेशनमध्ये काम करणाऱ्या एका डॉक्टरविरोधात 'पोक्सो'अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचा उल्लेखही याचिकेत करण्यात आला आहे.

## शासनामार्फत दिलेल्या पोषण आहारातून खासगी शाळेतील ३८ विद्यार्थ्यांना विषबाधा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : कळव्यातील खासगी शाळा सहकार विद्यालयात पाचवी आणि सहावीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहारामधून विषबाधा झाल्याचा प्रकार मंगळवारी दुपारी घडला आहे. दुपारच्या जेवणात मटकीची आमटी आणि भात खाल्यानंतर मुलांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरु झाला. यानंतर सर्व मुलांना तातडीने ठाणे महापालिकेच्या कळवा रुग्णालयात दाखल



करण्यात आले. रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या मुलांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरानी दिली आहे.

शासनाकडून सर्व सरकारी आणि खासगी शाळांमध्ये बचत गटाच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो. या शालेय पोषण आहारात मुखत्वे करून खिचडी दिली जाते. कळवा येथील सहकार विद्यालयात दुपारच्या जेवणात विद्यार्थ्यांना आहारात मटकीची आमटी आणि भात देण्यात आला होता. मात्र मटकीला वास येतं असल्याच्या तक्रारी मुलांनी केल्या. ही आमटी आणि भात खाल्ल्यानंतर मुलांना उलट्याचा त्रास सुरु झाला. शाळेतून कळवा रुग्णालयाला माहिती देण्यात आल्यानंतर तातडीने रुग्णवहिका पाठवून ३८ मुलांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच त्यांच्यावर तातडीने उपचार सुरु करण्यात आले.दाखल करण्यात आलेले विद्यार्थी हे पाचवी आणि सहावीचे विद्यार्थी असून सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाच्या वतीने देण्यात आली आहे. दरम्यान मुलांना देण्यात आलेली आमटीमधून मटकीचा वास येत असल्याने या संपूर्ण प्रकारानंतर पालक संतप्त झाले आहेत.

## गोळ्या घातल्या तरी आंदोलनातून माघार नाही; ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नागपूर : राज्यातील ओबीसींचे आरक्षण संपवण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत आहे, असा आरोप ओबीसी आंदोलनाचे नेते लक्ष्मण हाके यांनी केला. गोळ्या घातल्या, तलवारीचे वार केले तरी हक्काची लढाई थांबवणार नाही, असा ठाम निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर येथील सभेनिमित्त मंगळवारी हाके नागपूर येथे आले असता पत्रकारांशी बोलताना त्यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. शिंदे समितीच्या अहवालास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर नवा वाद उफाळून आला आहे. समितीला घटनात्मक अधिकार नाही, असा दावा करून हाके म्हणाले, सरकारने मराठा समाजाच्या आरक्षणाचा विचार करता ओबीसींची स्थितीही जाणून घ्यावी. मनोज जरांगे यांच्यासारखा आम्ही कायदा हाती घेतला नाही. ओबीसींच्या आंदोलनास बदनाम करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप हाके यांनी केला. झुंडशाही करून आम्ही कुणाला आव्हान देत नाही. लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन सुरू असल्याने विरोधकांनी नैराश्यातून हल्ला केला, मारहाण केली.

## सोनम वांगचुक यांचे पोलीस ठाण्यातच बेमुदत उपोषण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लडाखला सहाव्या अनुसूचीचा दर्जा मिळावा या मागणीसाठी समर्थकांसह राजधानी दिल्लीकडे कूच करणारे पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना सोमवारी रात्री सीमेवर पोलिसांनी ताब्यात घेतले. परंतु आपल्या मागण्यांवर ठाम राहत वांगचुंक यांनी कार्यकर्त्यांसह पोलीस ठाण्यातच बेमुदत उपोषण सुरू केले. महिनाभरापूर्वी लेह येथून निघालेल्या 'दिल्ली चलो पदयात्रा'चे नेतृत्व वांगचुक करत होते. सोमवारी रात्री त्यांच्यासह लडाखमधील सुमारे १२० जणांना ताब्यात घेण्यात आले.

'लेह अॅपेक्स बॉडी'ने (एलएबी) ही पदयात्रा आयोजित केली आहे. एलएबी 'कारगिल लोकशाही आघाडी'बरोबर (केडीए) गेल्या चार वर्षांपासून लडाखला राज्याचा दर्जा मिळावा, संविधानाच्या सहाव्या अनुसूचीअंतर्गत समावेश करावा, लडाखसाठी लोकसेवा आयोगासह लवकर



भरती प्रक्रिया आणि लेह, कारगी जिल्ह्यांसाठी स्वतंत्र लोकसभेच्या जागा मिळाव्यात आदी मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत.

वांगचुक आणि त्यांच्याबरोबरील कार्यकर्त्यांनी प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन केल्याने दिल्ली सीमेवर ताब्यात घेण्यात आले. त्यांना बवाना, नरेला औद्योगिक क्षेत्र आणि अलिपूरसह विविध पोलीस ठाण्यांत नेण्यात आल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. भारतीय न्याय संहितेचे कलम १६३ राष्ट्रीय (पान २ वर...)

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली माझी वसुंधरा अभियानात सोलापूर जिल्ह्याचे यश

### जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांनी दिली माहिती

# माझी वसुंधरा अभियानात सोलापूर जिल्हा विभाग स्तरावर प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत आपल्या कार्यक्षेत्रात चांगली कामगिरी करणाऱ्या नगरपालिका व महानगरपालिका यांना विविध पुरस्कार दिले जातात. सोलापूर जिल्ह्याला विविध क्षेत्रात पुढील पुरस्कार प्राप्त झालेले असून सोलापूर जिल्ह्याने या अभियानात पुणे विभागात प्रथम क्रमांक प्राप्त केल्याची माहिती जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांनी दिली आहे.

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत २७ सप्टेंबर २०२४ रोजी राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका यांना विविध पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहेत. यामध्ये १.सोलापूर महानगरपालिका भूमी थिमॅटिक याच्या अंतर्गत दोन कोटी बक्षिसास पात्र ठरली आहे.

२.पंढरपूर नगर परिषद राज्यस्तरीय तृतीय क्रमांक मिळवून तीन कोटी रुपये बक्षीस पात्र ठरली आहे.

३.मोहोळ नगरपरिषद राज्यस्तरीय उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक मिळवून दीड कोटी बक्षिसास पात्र ठरली आहे. ४.अकलूज नगर परिषद विभाग स्तरावर प्रथम येऊन ७५ लाख रुपये बक्षीसास पात्र ठरली आहे. ५.अनगर नगर पंचायत विभाग स्तर उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक मिळवून ५० लक्ष बक्षीसास पात्र ठरली आहे

६.माढा नगरपंचायत विभाग स्तर उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक मिळवून ५० लक्ष बक्षिसास पात्र ठरली आहे.



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या नेतृत्वाखाली माझी वसुंधरा अभियानात सर्वोत्तम कामगिरी करणारा जिल्हा म्हणून सोलापूरला विभाग स्तरावर प्रथम क्रमांक मिळालेला आहे. माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत पुणे विभागाचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी सोलापूर जिल्ह्याची विशेष बैठक घेतली, त्यांनी या बैठकांमध्ये मुख्याधिकाऱ्यांना हरित आच्छादनाचे प्रमाण वाढविणे, सायकल ट्रकचे प्रमाण वाढविणे, तसेच ई व्हेईकल चा वापर वाढवणे यावर विशेष भर देण्यास सांगितला होता. या अभियानाकरीता पुणे विभागाच्या सह आयुक्त पूनम मेहता तसेच सह आयुक्त दत्तात्रय लांघी यांची विशेष मार्गदर्शन लाभले होते.

या अभियानासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वेळोवेळी बैठका घेऊन तसेच प्रशिक्षण सत्र आयोजित करून विविध स्पर्धा आयोजित करून व परीक्षेचा परिपूर्ण अभ्यास करून त्यात जास्तीत जास्त गुणांक मिळावे याकरिता परीक्षा आयोजीत करून संपूर्ण जिल्ह्यातील नगरपालिका नगरपंचायती यांची स्पर्धेत उतरण्यासाठी पूर्ण तयारी करून घेतली होती.

संपूर्ण नगर पालिकेचे माझी वसुंधरा अभियान ४.० याकरिता जिल्हा प्रशासन अधिकारी वीणा पवार ,सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन यांची जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तसेच शहाजी चव्हाण यांनी याकरिता तांत्रिक तज्ञ म्हणून जिल्हा स्तरावरील कामगिरी पार पाडलेली आहे या अभियानामध्ये जिल्हास्तरावरून पूर्ण वर्षभरात करावयाचे विविध कार्यक्रम व करावयाची कामे याचे वेळापत्रक आखून देण्यात आले होते.

यामध्ये जास्तीत जास्त झाडे लावणे, हरित पट्ट्याची निर्मिती करणे, वृक्ष गणनांना करणे ,प्लास्टिक पिशव्यांवर बंदी, शहरात चार्जिंग स्टेशन उभारणे, इलेक्ट्रिक वाहनांना चालना देणे, विहीर पुनर्भरण ,एलईडी पथदिव्यांचा वापर, तसेच पर्यावरण संबंधी जनजागृती चे विविध कार्यक्रम आयोजित करून व पर्यावरण पूरक ,गणेशोत्सव, होळी, वटपौर्णिमा,दिवाळी हे कार्यक्रम हाती घेऊन शहरात वृक्षाच्या आच्छादनाचे प्रमाण वाढविणे,धुळीचे प्रमाण कमी करणे ,भूगर्भिय पाण्याची पातळी वाढवणे ,असे पर्यावरण संतुलन राखणारे कामे हाती घेण्यात आली आहेत.सोलापूर जिल्ह्यातील महानगरपालिका ,नगरपालिका व नगरपंचायती या कामामुळे मोठे प्रमाणात गुणांक प्राप्त झाले आणि म्हणूनच सोलापूर जिल्ह्याने विभाग स्तरावर माझी वसुंधरा ४.० या अभियानात प्रथम क्रमांक मिळवला आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या यशस्वी नेतृत्वाखाली पुन्हा एकदा सोलापूर जिल्ह्याने चांगली कामगिरी करून दाखविली आहे.

## संपादकीय....

### कानमंत्र

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दादरमधील स्वामि नारायण मंदिरातील योगी सभागृहात शहा यांच्या उपस्थितीत भाजपचा संवाद मेळावा पार पडला. 'शक्ती कार्यकर्त्यांची- प्रचिती आत्मविश्वासाची' असे घोषवाक्य घेऊन भाजपने ठिकठिकाणी मेळावे आयोजित केले आहेत. 'मतभेद विसरून काम करा,' असे आवाहन करून शहा म्हणाले, 'लोकसभेत दोन जागा आल्या तेव्हा कुणीही पक्ष सोडून गेले नव्हते. आ-ताही राज्यात महायुतीच सरकार स्थापन करील. महाराष्ट्राची निवडणूक देशाची दशा आणि दिशा बदलणारी आहे. ६० वर्षांत महाराष्ट्रात सलग तीनदा एकही पक्ष निवडणूक जिंकलेला नाही. आपण महान भारताच्या रचनेसाठी राजकारणात आलो आ-होत. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचा सल्ला देऊन पक्षांतर्गत वादांबाबत शहा म्हणाले, 'प्रत्येक घरात वाद असतातच, मात्र हे वाद आणि मतभेद निवडणुकीपूर्वी दूर करा. काहींना कामे करायची नसतात; पण खरा कार्यकर्ता काम करताना विचार करीत नाही. जे काम करतात तेच निवडणूक जिंकतात. निराशा झटकून टाका, कुणीही सर्वेक्षणांचा विचार करू नका. राज्यात भाजपचे सरकार येईल त्यासाठी जोम ात आणि शुद्धीत राहून काम करा.' राज्यात महायुतीला रोखण्याची ताकद कुठल्याही पक्षात नाही. आपल्याविरुद्ध आपल्या नगरसेवक, आमदार आणि खासदारांच्या विरोधात जनतेत असलेली नाराजी दूर करा. प्रत्येक निवडणूक बूथवर आपल्याला १० कार्यकर्ते पाहिजेत. दसऱ्यापासून प्रचार संपेपर्यंत हे कार्यकर्ते त्यांच्या बूथच्या कक्षेत फिरत राहतील. या कार्यकर्त्यांनी आपली विचारसरणी असलेल्या मतदारांना मतदानासाठी उतरवावे. प्रत्येक बूथवर किमान २० लोकांना भाजपचे सदस्य करा. सदस्य करताना मत मागू नका. सदस्य झाल्यावर त्यांना आपसूक मतदानाचे महत्त्व कळेल, अशा शब्दांत शहा यांनी कार्यकर्त्यांना कानमंत्र दिला.

## जिल्हाप्रमुख मार्ग ३१ यावरील फलक लावण्यास लागले अकरा वर्ष; सार्वजनिक बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा / राहुल साबळे

चिखली तालुक्यातील मौजे मेरा खुर्द अंत्रीखेडेकर मेरा बुद्रुक जिल्हा प्रमुख मार्ग ३१हा रस्ता अकरा वर्षांपूर्वी जिल्हा परिषद ने सार्वजनिक बांधकाम विभाग बुलढाणा यांच्याकडे हस्तांतरित केला आहे या रोडचे कित्येक वेळेस तात्पुरते काम करून व काही वेळेस ठेकेदाराने अर्धवट काम करून लाखो रुपयांची बिले काढून घेतले आहे त्याकडे सार्वजनिक उपविभाग देऊळगाव राजा यांचे पूर्णतः दुर्लक्ष आहे सार्वजनिक बांधकाम विभाग देळगाव राजा यांना जिल्हाप्रमुख मार्ग ३१ चे हद्दच माहीत नसल्यामुळे सदर रोड हा कुठून आहे आणि काय आहे याची कोणत्याही कल्पना सार्वजनिक बांधकाम उपविभाग देळगाव राजा यांच्याकडे वारंवार तक्रारी करून सुद्धा त्यांनी तक्रारदार यांना आजपर्यंत माहिती देण्यास असमर्थ ठरले आहेत या रोडवर यापूर्वी अनेक अपघात होऊन काही ची प्राण गेले आहे आणि आज सुद्धा या रोडवर भरपूर अपघात होऊन लोकांना अपंगत्व आले आहे सदर रोड हा अकरा वर्षापासून सार्वजनिक बांधकाम उप विभाग देळगाव राजा यांच्याकडे आहे त्यांनी आता कुठे फलक लावून आपला पुरुषार्थ दाखवला आहे या फलकामुळे अपघात कमी होणार आहेत का हा सर्वसामान्य जनतेला पडलेला प्रश्न आहे जर सदर रस्ता हा नियमानुसार रुंदीकरण केले तर सदर रोडवर अपघात होणार नाही आता सुद्धा या रोडवर तात्पुरते डागडोजी केली आहे परंतु सदर ठेकेदार यांनी काहीतरी धातुर्मातुर काम करून फळ काढला आहे व काही दिवसापूर्वी मेरा बुद्रुक वरून अंत्री खेडेकर येणाऱ्या रोडचे संबंधित ठेकेदाराने काम केले आहे परंतु ते काम सुद्धा अर्धवट सोडून ठेकेदार पळून गेला आहे तसेच आता सुद्धा अंत्रीखेडेकर ते मेरा खु रोडवर जे खड्ड्याची डाग ढुजी केली आहे तो ठेकेदार सुद्धा अर्धवट काम सोडून गेला आहे तरी सदर रोडचे कोणतेही प्रकारचे बिल अदा करू नये असे सर्वसामान्य जनतेचे सार्वजनिक उपविभाग देळगाव राजा यांच्याकडे मागणी केली आहे तसेच जिल्हाप्रमुख मार्ग ३१ नियमानुसार शासन निर्णयानुसार अंतिम हादी नुसार निश्चित करून दोन्ही साईडने नाल्या काढून सदर रस्त्याचे काम हे उत्कृष्ट दर्जाचे करावे या रस्त्याला एखादा तरी चांगला ठेकेदार मेळावा या रोडचे काम करणारे दोन्ही ठेकेदार हे अर्धवट काम करून पळून गेले आहे जर या रस्त्याचे रुंदीकरण आणि उत्कृष्ट काम केले नाही तर सदर गावच्या ग्रामपंचायत हा विधानसभेच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे चिन्ह दिसून येत आहे तरी संबंधित अधिकारी यांनी या बाबीकडे लक्ष देऊन ठेकेदार यांच्या कडून जिल्हाप्रमुख मार्ग ३१ मार्गाचे अंतिम हादी नुसार योग्य ती कारवाई करावी आणि अंतिम रुंदीकरण मापाचे सुद्धा फलक लावावे ज्याप्रमाणे ११ वर्षानंतर जे फलक लावले त्यामध्ये एकही फलक हा रुंदीचा नाही तरी संबंधित विभागाने या बाबीकडे लक्ष देऊन अंतिम रुदी नुसार अंतिम हादीचे जे फलक आहेत ते लावावेत आणि सदर रोडची जि दयनीय अवस्था खड्डेमय झाले आहे त्याची दखल घेऊन संबंधित ठेकेदार यांना जे खड्डे सोडून ठेकेदार



पळून गेले त्यांना ते परत भरून घेण्याचे मागणी सर्वसामान्य जनता करीत आहे

## सोनम वांगचुक यांचे पोलीस ठाण्यातच बेमुदत उपोषण

(पान १ वरून..) राजधान-ीत लागू करण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना परत जाण्यास सांगण्यात आले, परंतु ते मतावर ठाम असल्याचे अधिकारी म्हणाले. त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. वांगचुक यांना बवाना पोलीस ठाण्यात नेण्यात आले असून त्यांना वकिलांना भेटू दिले जात नसल्याचा दावा 'एलएबी'च्या प्रतिनिधीने केला. वांगचुक आणि इतरांनी अधिकृत परवानगीसह पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना ई-मेलद-्खील केले होते, परंतु त्या माहितीचा वापर आंदोलकांना ताब्यात घेण्यासाठी करण्यात आल्याचा दावाही या प्रतिनिधीने केला आहे. पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि इतर अनेकांना दिल्ली सीमेवर ताब्यात घेतल्याप्रकरणी मंगळवारी दिल्ली उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली. याचिकाकर्त्यांच्या वकिलाने मुख्य न्यायमूर्ती मनम ोहन आणि न्यायमूर्ती तुषार राव गेडेला यांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण सूचिबद्ध करण्यास सांगितले आहे.

## श्री क्षेत्र नंदिकेश्वर परिसराचा होणार कायापालट, आ. दत्तात्रय भरणे यांच्याकडून ५ कोटींचा निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले दगडवाडी येथील श्री क्षेत्र नंदिकेश्वर परिसराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्व-पूर्ण असलेल्या पुर प्रतिबंधात्मक संरक्षक भिंत व घाट बांधणीच्या कामासाठी आम दार दत्तात्रय भरणे यांच्या प्रयत्नातून आज सुमारे ५ कोटींचा निधी मंजुर झाला असुन या निमित्ताने आमदार भरणे यांनी महिनाभरापूर्वी गावकऱ्यांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे.

श्री क्षेत्र नंदिकेश्वर हे निरा नदीच्या काठावर वसलेले महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असुन हे एक पुरातन हेमाडपंथी मंदिर आहे.या तीर्थक्षेत्राचा उल्लेख वेद-पुराणातही आढळतो. या ठिकाणी वर्षभर असंख्य भाविकांची मंदियाळी असते.त्यामुळे या तीर्थक्षेत्राचे महत्व लक्षात घेत आमदार दत्तात्रय भरणे यांनी या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आजवर लाखो रुपयांचा निधी दिला असुन यातुन अनेक विकासकामे म ार्गी लागली आहेत.

मात्र हे देवस्थान निरा नदीच्या अगदी काठावर वसले असल्यामुळे निरा नदीला येणाऱ्या पुरामुळे या मंदिराला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी आमदार दत्तात्रय भरणे यांच्याकडे यावर ठोस उपाययोजना करण्याची सातत्याने मागणी केली होती.

गेल्या महिनाभरापूर्वी आमदार भरणे यांनी श्रावणी यात्रेच्या निमित्ताने श्री क्षेत्र नंदिकेश्वर परिसराची पाहणी करुन या ठिकाणी संरक्षक भिंत व घाट बांधण्याचा शब्द ग्रामस्थांना दिला होता.त्यानुसार आज आमदार भरणे यांनी श्री क्षेत्र नंदिकेश्वर परिसरात पुर संरक्षक भिंत व घाट बांधणीच्या कामासाठी तब्बल ५ कोटींचा निधी तात्काळ मंजुर करुन ग्रामस्थांना दिलेला शब्द पुर्ण केला आहे..

## कृषी पर्यवेक्षक विवेक दोंदे कृषी सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने देण्यात येणार कृषी सेव-ारत्न पुरस्कार भिवंडी तालुक्यातील अनगाव येथे कार्यरत असलेले कृषी पर्यवेक्षक विवेक दोंदे यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याचे राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि कृषीमंत्री धनंजय मुंढे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतीतील उत्पादनात वाढ व्हावी व शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी कृषी विस्त-ारक या नात्याने दोंदे यांनी शेतीविषयक योजनांची माहिती प्रात्यक्षिके व प्रशिक्षणांद्वारे शेतकर्यांपर्यत पोहचविण्याचे काम केले. दोंदे यांनी भात पिकाच्या उत्पादन वाढीकरिता शेतीशाळा व इतर माध्यमातून विविध पीक प्रात्यक्षिकांद्वारे विविध लागवड पध्दतीने उद्दीष्ट्य साध्य केले. २०१९-२० मध्ये उत्कृष्ट शेती शाळेचा द्वितीय क्रमांक प्राप्त झाला होता. त्यांनी केलेल्या प्रचार व जागृतीम ुळे त्यांच्या कार्यक्षेत्रात नरेगा अंतर्गत फळ व फ ुलबागेच्या क्षेत्रात वाढ झाली. कडधान्य आणि भाजीपाला लागवडीच्या क्षेत्रात वाढ होण्यासाठी दोंदे यांनी शेतकर्यांमध्ये भरीव जागृती केली. मृद व जलसंधारण योजनेतंर्गत त्यांनी भिवंडी तालुक्यात केलेल्या कामामुळे पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या पातळीत १.५० मीटरने वाढ झाली व १०५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आल्याने दुबार पेरणीचे संकट टळले. श्रमदानातून त्यांनी वनराई बंधार्याचे काम केल्याने त्यांना वनराई पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रेशीम किडा संगोपन, गट शेती, अळंबी उत्पादन, उस लागवड अशा पीकांसाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविल्याने शेतकर्यांच्या उत्पन्नात वाढ झाली.

## उपजिल्हाधिकारी पदी निवड झाल्याबद्दल डॉ महेश घाटुळे यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील घा-रगाव येथील सामान्य कुटुंबातील डॉ महेश घाटुळे यांनी पहिल्याच प्रयत्नात एम पी एस सी स्पर्धा परी-क्षा क्रॅक करून संपूर्ण महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक पटकावला आणि उपजिल्हाधिकारी पदा पर्यंत गरूड झेप घेतली. त्यांनी कोणत्याही प्रकारची कोचिंग न लावता स्वतः स्पर्धा परिक्षेचा अभ्यास केला. यावेळी संपूर्ण राज्यातून सात लाखांपेक्षा जास्त स्पर्धक परिक्षेस बसले होते आणि त्यांमध्ये डॉ. म हेश यांनी प्रथम येण्याचा बहुमान मिळविला हे विषेश

तसेच कु मयुरी मणके हिने यावर्षी निट परिक्षेत उत्तम गुण मिळवून धाराशिव येथील शासकीय मेडिकल कॉलेज मध्ये प्रवेश मिळविला. या दोन्ही ही यशवंत आणि गुणवंतांचा कळंब तालुका सकल धनगर समाज आणि महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत येथील वरिष्ठ बालरोगतज्ञ व प्रबोधन मंच चे संचालक डॉ रामकृष्ण लोंढे, प्रशिद्द स्री रोगतज्ञ डॉ. सत्यप्रेम वारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

सत्काराला उत्तर देताना दोघांनीही कठोर परिश्रम, जिद्द,चिकाटी,अभ्यासात सातत्य आणि उपलब्ध संधिचा लाभ घेऊन यश संपादन केले पाहिजे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घाटुळे ज्वेलर्सचे संतोष घाटुळे, निर्मळ ज्वेलर्सचे अंकुश निर्मळ, गोकुळ कुराणाचे अशोक शिंपले, बालाजी वगरे, नानासाहेब कवडे, वाघमोडे सर, हनुमंत लोकरे सर, यादव सर, भुजंग लोकरे, पांडुरंग लोकरे ई नी परिश्रम घेतले. डॉ. अशोक शिंपले सर यांनी सुत्र संचालन केले तर सरपंच संतोष कसपटे यांनी आभार मानले. कार्यक्रमास गावांतील प्रतिष्ठित मंडळी व ईतर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिक्षकाचा सन्मान म्हणजे घडणाऱ्या पिढीचा आत्मविश्वास : पद्माकर रंगारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




बाराभाटी/प्रतिनिधी : ग्रामीण भागात घडणारे विद्या-र्थी आणि त्यांना घडविणारे शिक्षक महत्त्वाचे घटक आ-हेत. गावात विद्यार्थी मिळवून शिक्षक शिकवितो आणि विद्यार्थी घडवितो. हे कार्य फार कसरतीचे आहे. सहवासात राहून शिक्षक ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रगतीच्या मार्गावर आणतो. तेव्हा अशा शिक्षकाचा सन्मान होणे आवश्यक आहे आणि हे केलेच पाहिजे. म्हणून शिक्षकाचा सन्मान म्हणजे घडणाऱ्या पिढीचा आत्मविश्वास...! असे प्रतिपादन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पद्माकर रंगारी यांनी केले आहे. ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावारुन बोलत होते.

यावेळी मंचावर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पद्माकर रंगारी यांच्या अध्यक्षतेखाली मुख्याध्यापक श्री राऊत, सत्कार मुर्ती रविंद्र वालदे सेवानिवृत्त शिक्षक, मंगेश मेश्राम, दीपा घरतकर, शिशुपाल बेलखोडे, गीता मेश्राम, अल्का चव्हारे तसेच ग्रामपंचायत येथील कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

शिक्षक रवींद्र वालदे हे शिक्षण विभागासह नाटकाचे कलाकार व रसिक आहेत. तसेच सामाजिक सलोखा राखत एक उत्तम कार्यकुशल आहेत. अनेक पिढीला घडवत समाजासमोर नवा आदर्श नेहमी ठेवला आहे. नियत वयोमानानुसार प्रसंगी वालदे यांच्या पत्नीसह शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा बाराभाटी येथे ( दि.३०) ला दुपारी ०४.०० वाजता संपन्न झाला.

सत्कार समारंभाचे संचालन व आभार शिक्षिका प्रज्ञा भवेश शहारे यांनी केले. तर स्वयंसेवीका पपीता बेलखोडे व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

### कवी हनुमंत चांदगुडे यांनी मुलांना दिला सुखद धक्का

## पत्र वाचून कवी आला विद्यार्थ्यांच्या भेटीला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पुणे/प्रतिनिधी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाबळेवाडी येथे साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी आठवीच्या वर्गात नुकतीच आळाशी कविता शिकवली. तेव्हा वर्गातील दिया थिटे, अनुष्का वाबळे आणि संस्कृती विरोळे या तीन मुलींनी कवी हनुमंत चांदगुडे यांना पत्र लिहिले व त्यात त्यांना कविता आवडल्याचे सांगितले. तसेच आपण आमच्या शाळेत या. आम्ही तुम्हाला भेटू इच्छितो, अशी भावनिक साद घा-तली. अर्थात कवी येतील ही गोष्ट स्वप्नात देखील अपेक्षित नसताना एक निरागस भावना त्यांनी कवींपुढे अगदी नकळतपणे प्रकट केली. त्यांचे पत्र मि ळताच चांदगुडे यांनी त्यांना पत्र लिहून त्यांचे अभिनंदन करत एक दिवस नक्की शाळेत येऊ अशी ग्वाही दिली.

तेव्हा आपल्या शब्द पूर्ण करत अचानकपणे कवी हनुमंत चांदगुडे यांनी शाळेत प्रवेश करताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. माईक हातात घेऊन चांदगुडे यांनी दिया थिटे, अनुष्का वाबळे आणि संस्कृती विरोळे यांना पुढे बोलावून त्यांचे अभिनंदन करत म्हटले, या तिघी केवळ निमि त्त झाल्या पण मी तुमच्या सर्वांना भेटण्यासाठी या ठिकाणी आलो आहे, असे म्हणत त्यांनी सर्वांचीच मने जिंकली. त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना आळाशी कवितेची पार्श्वभूमी सांगत कविता समजून दिली. कवी आ-पले जगणे आपल्या कवितेतून मांडत असतो आणि ते मांडताना आपण समाजाचेही देणे लागतो या भावनेने प्रामाणिकपणे काम केले तर आयुष्यात यश निश्चित मिळते असा संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला. शब्दांचे सौंदर्य समजावून सांगताना त्यांनी अनेक शब्दांची फिरवा फिरवा करत शब्दांचे अर्थ कसे बदलतात हे विद्यार्थ्यांना उदाहरणासह समजावून सांगताना ते म्हणाले, प्रत्येक बाईला आपला नवरा राम असावा असेच वाटते पण हाच नवरा शब्द जर उलटा करून वाचला तर त्याचा रावण होतो आणि तोच त्यांच्या नशिबी असतो, असे विनोदी शैलीत सांगत त्यांनी प्रत्यक्ष शब्दाची फोड करून त्याचा अर्थ त्यांना उलगडून सांगितला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन बेंडभर यांनी केले स्वागत गोरख काळे तर आभार किरण अरगडे यांनी मानले.

## पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने देशी बनावटी रिव्हाल्वर सह आरोपीस केले जेलबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अर्जुन भोसले सो उपविभागीय पो-लीस अधिकारी पंढरपूर विभाग वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२२१८/९/२०२४ रोजी२१/४५ चे सुमारास गुन्हे प्रकटीकरण पथकासह पोलीस ठाणे प्रतिबंधक ग्रस्त करीत असताना सुरू गुप्त माहिती दाराकडून माहिती मिळाली अशी की दूध पंढरी जवळ येसगाव येथे देशी बनावटी रिवाल्वर घेऊन तो इसम येथे फिरत आहे

सदर बातमी बाबत वरिष्ठांना माहिती सांगून सदर प्राप्त माहिती सांगून त्याची खातर जमा करून कारवाई करण्या कामी पथक तात्काळ रवाना केले नामे योगेश म ारुती खंडागळे वय २६ वर्ष राहणार खंडाळी तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर या ताब्यात घेऊन तिचे अंग दळती घेतल्या असता त्याच्या कम रेला एक देशी बनावटीचे रिवाल्वर ते पुढील कामे कारवाई करून ताब्यात घेतले त्याच्याविषयी शेअर पोलीस ठाण्यामध्ये त्याच्यावर कारवाई करून गुर नंबर ५९४/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम कलम नंबर ३,२५ अन्वये गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक मा श्री अतुल कुलकर्णी सो. अप्पर पोलीस निरीक्षक मा श्री प्रीतम यावलकर सो. मा श्री अर्जुन भोसले, उपविभागीय पोलिस अधिकारी पंढरपूर विभाग. पंढरपूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा श्री श्री विश्वजीत घोडके सो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस आशिष कांबळे. सहायक पोलीस निरीक्षक राजेश गोसावी, सहाय्यक पोलीस निरीक्षक नागनाथ कदम, पोलीस हेड कॉन्स्टेबल शरद कदम, दहा६३ बिपिनचंद्र ढेरे, पोलीस कॉन्स्टेबल ३९६ सुरज हेंबाडे, ३९८ सीमा गोडसे , १७ ८९ सचिन हेंबाडे, ४९३ नवनाथ माने, ६०१ नितीन पुलुस्कर, पंधराशे तेरा बजरंग बिचुकले, २१९० समाधान माने, बाराशे सोळा शहाजी मडले, १९०४ निलेश कांबळे, सायबर विभागाचे पोलीस कॉन्स्टेबल योगेश नरळे, यांनी केले असून त्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक आशिष कांबळे करीत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून दगडाने मारहाण ; तिघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत दगडाने मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ३० सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान पार्क चौक येथे घडली.याप्रकरणी सत्यजित गणेशदास परदेशी (वय-३४,रा.लक्ष्मीनारायण अपार्टमेंट,दक्षिण सदर बझार) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अग्निवेश नकाते (वय-३०,रा.बाळे) व त्याचे दोन अज्ञात साथीदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे जिल्हा स्तरीय स्पर्धा असल्याने कोचिंग करण्यासाठी आले होते.त्यावेळी फिर्यादी व त्यांचा मित्र कपिल कोळी असे चहा पिण्याकरिता जात असताना समोरून दोन अज्ञात इसम आले व फिर्यादीस तू माझे मित्र नकाते बद्दल मागे का बोलतो असे म्हणाले. त्यावेळी फिर्यादी तुम्ही कोण आहात,मी ओळखत नाही.त्यांना समोर घेऊन या असे म्हणाले असता,फिर्यादीस शिवीगाळ करून तुला लय मस्ती आली आहे.असे म्हणत मारहाण केली.त्यानंतर अग्निवेश नकाते हा त्याची दुचाकी वरून येऊन त्यानेही फिर्यादीस शिवीगाळ करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.तसेच त्यातील एकाने दगड उचलून फिर्यादीच्या पाठीवर हातावर मारून जखमी केले व अग्निवेश नकाते याने गाडीच्या चावीने फिर्यादीच्या तोंडावर छातीवर मारून जखमी करत तुला खल्लास करतो अशी धमकी दिली. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस नाईक मुलाणी हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ करत मारहाण ; पतीसह चौघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून घरातील सर्व लोकांसाठी स्वयंपाक तू एकटीनेच बनवायचा,सर्वे कामे तूच करायची.तुला जेवण बनवता येत नाही,लग्नात योग्य तो मानपान दिला नाही. दागिने घातले नाही.चार चाकी वाहन किंवा घर दिले नाही असे बोलून माहेरून दहा लाख रुपये घेऊन ये म्हणत शारीरिक व मानसिक त्रास देऊन छळ केल्याची फिर्याद स्नेहल निखिल शिंदे (वय-३०,रा.स्वप्निल निवास,अभिषेक नगर,मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत

# विविध विकास कामांसाठी ५ कोटी निधी मंजूर : आ. आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत पंढरपूर- मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये सन २०२४-२५ या वर्षातील विविध विकास कामांसाठी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे-पाटील व पालकमंत्री ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्या माध्यमातून ५ कोटी निधी मंजूर झाल्याची माहिती मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे. सदर निधीतून मतदारसंघाच्या पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील विविध गावांच्या दलित वस्तीमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या विकासासाठी व्यायामशाळा बांधणे, अभ्यासिका उभारणे, समाज मंदिर बांधणे व दुरुस्ती करणे, संविधान भवन बांधणे, दलित वस्ती अंतर्गत रस्ते सुधारणा व कॉंक्रिटीकरण करणे आदी विकास कामांचा समावेश असल्याची माहिती आ. आवताडे यांनी दिली आहे.

या निधीतून पंढरपूर तालुक्यामध्ये मंजूर झालेली कामे पुढीलप्रमाणे- कासेगाव येथील झेंडा चौक येथे संविधान भवन बांधणे २० लाख, भाळवणी येथील मस्के चौक येथे संविधान भवन बांधणे २० लाख, लक्ष्मी टाकळी येथील अण्णाभाऊ साठे नगर मधील लक्ष्मी मंदिरासमोर संविधान भवन बांधणे २० लाख, तावशी येथील अण्णाभाऊ साठे नगर मधील जुन्या जिल्हा परिषद शाळेसमोर संविधान भवन बांधणे २० लाख, अनवली येथील भंडारे वस्ती भीम नगर येथे सभा मंडप बांधणे १५ लाख, मुंढेवाडी येथील मरीआई मंदिरासमोर सभामंडप बांधणे १५ लाख, शिरगांव येथील मरीआई मंदिरासमोर सभामंडप बांधणे १० लाख, कोर्टी येथील मातंग समाज वस्तीमध्ये सभागृह बांधणे १० लाख, तपकिरी शेटफळ येथील बनसोडे वस्ती येथे समाज मंदिर बांधणे १५ लाख, तनाळी येथील दलित वस्तीमध्ये सभा मंडप बांधणे १० लाख, उंबरगाव येथील होवाळे वस्ती येथे सभामंडप बांधणे १० लाख, गोपाळपूर येथील महादेव मंदिराशेजारी सभामंडप बांधणे १० लाख. या निधीतून मंगळवेढा तालुक्यामध्ये मंजूर झालेली कामे पुढीलप्रमाणे- माचणूर येथे हरिजन वस्ती प्रतीक नगर येथे संविधान भवन बांधणे ४० लाख, आंधळगाव येथील मातंग वस्तीमध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, सोडी येथील भीमनगर भोरकडे वस्ती संविधान भवन बांधणे २० लाख, बोराळे येथील भीम नगर मध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, नंदेश्वर येथील इंदिरानगर गावठाण येथे संविधान भवन बांधणे २० लाख, रड्डे येथील भीम नगर गावठाण मध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, मरवडे येथील आंबेडकर नगर जुना तक्का येथे संविधान भवन बांधणे २० लाख, जुनोनी येथील दलित वस्ती क्रमांक एक भीम नगर मध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, उचेठाण येथील हरिजन वस्तीमध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, भाळवणी येथील हरिजन वस्तीमध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, नंदूर येथील भीमनगर वस्तीमध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, खडकी येथील कसबे वस्तीमध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, खुपसंगी येथील इंदिरानगर मध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, अरळी येथील गावठाण दलित वस्ती मध्ये संविधान भवन बांधणे २० लाख, लवंगी येथील गावठाणमध्ये संविधान भवन बांधणे २० लाख.

> विकासापासून वंचित असणाऱ्या दलित घटकांच्या विकासासाठी आ. समाधान आवताडे यांनी एवढा मोठा निधी उपलब्ध करून दलितांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोठी चालना दिली आहे. दलितवस्तीसाठी मंजूर झालेल्या या निधीतून अनेक कामे मार्गी लागणार असून याचा फार मोठा फायदा दलित समाजाला होणार आहे.मतदारसंघातील दलित घटकांच्या विकासासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रथमतःच निधी मंजूर झाल्याने संपूर्ण दलित समाज आ. आवताडे यांच्या कार्यपद्धतीवर जाम खुश झाला आहे.
>
> **- चंद्रकांत जाधव (ज्येष्ठ नेते कासेगाव)**



अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या शिक्षण, आरोग्य, रस्ते पाणी या सुविधा समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी या महत्त्वकांक्षी योजनेमार्फत हा भरीव निधी मंजूर झाला आहे. मंजूर झालेल्या सदर निधीमुळे मतदार संघाच्या कार्यक्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व धोरणात्मक विकासासाठी मोठी चालना मिळणार आहे.

## कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाचा क्रीडा स्पर्धेत अव्वल




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व पंचायत समिति अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाने बाजी मारली आहे. ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कु.अल्फिया पठाण हिने दुसरा क्रमांक मिळवला असून १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवली आहे.

नितेश कत्ते याने भालाफेक या खेळ प्रकारात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला असून गोळा फेक या प्रकारात तालुक्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे. बसलींगप्पा कालीबत्ते याने गोळा फेक या क्रीडा प्रकारात तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवला असून, लांबउडी या स्पर्धेत तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवला आहे. श्रेयस सावंत या विद्यार्थ्याने बुद्धिबळ स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

१९ वर्षाखालील मुलीच्या क्रिकेट संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला असून कबड्डी स्पर्धेत तालुक्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे. १९ वर्षाखालील मुलांच्या संघाने क्रिकेट स्पर्धेत तालुक्यात दुसरा क्रमांक मिळवला आहे.

सर्व यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक क्रीडा शिक्षक कुमार जाधव व रंजना चव्हाण यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री सचिन कल्याणशेट्टी, संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभागप्रमुख रूपाली शहा, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

## सिद्धार्थ सोशल फाऊंडेशन यांच्या वतीने एम. आर. मसूती यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : एम आर मासूती यांना उत्कृष्ठ अभियंता पुरस्कार मिळाल्यामुळे आज सिद्धार्थ सोशल फाऊंडेशन यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी संस्थेचे अध्यक्ष तथा गोगांव ग्रामपंचायत उपसरपंच कमलाकर सोनकांबळे,सचिव निजाप्पा गायकवाड, सरपंच सिद्धाराम मठपती,उपसरपंच श्रीमंत कुंटोजी, सरपंच दिलीप कदम,सुनील सावंत, अंबादास गायकवाड,यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले

## हिमायतनगर पोलिस मित्र तालुकाध्यक्षपदी लक्ष्मण भैरेवाड तर उपाध्यक्षपदी निलेश शैनेवाड यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड जिल्हा प्रतिनिधी/ : नांदेड - हिमायतनगर पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारत पोलीस मित्र संघटनेचे बैठक दि.२९/९/२४रोजी तळ्यावरचा गणपती मंदिर येथे पार पडली आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंकुश मेटकरी महाराष्ट्र पोलीस मित्र जनसंपर्क प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली पोलिस मित्र संघटना कार्यकारिणी जाहीर करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून सदाशिव पतंगे होते,पोलीस मित्र संघटनेचे तालुकाध्यक्षपदी लक्ष्मण बालाजी भैरेवाड, उपाध्यक्ष निलेश शैनेवाड,पोलीस मित्र ता.अध्यक्ष लक्ष्मण बालाजी भैरेवाड. तर उपाध्यक्ष निलेश शेन्नेवाड, पोलीस मित्र संघटनेचे सदस्य मारोती भैरेवाड,ओम काईतवाड,योगेश झुंकुटवाड, राज काईतवाड,बजरंग कोळगिर, परमेश्वर कोळगिर, आकाश कदम,आवधुत सोलंकर,आवधुत गोपवाड, बजरंग काईतवाड, सिधु काईतवाड, भागवत काईतवाड, संतोष कदम, केरबा कदम,मारोती कदम. नंदकिशोर वानखडे. संतोष शामलवाड,भागवत जळपते, योगेश पिसकेवार, नितिन जंगेवाड, राम कोमलवाड,शिवाजी बाचकलवाड, शाम सिंह राजपुत,विठ्ठल सुर्यवंशी,विषाल राठोड,आशिष राठोड, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आले.

तालुकाध्यक्ष पदासाठी एकमेव लक्ष्मण भैरेवाड यांचेच नाव आल्याने उपस्थित पोलीस मित्र सदस्यानी एकमताने अनुमोदन दिल्याने निवड बिनविरोध करण्यात आली. त्यानंतर तालुका अध्यक्ष लक्ष्मण भैरेवाड यांनी उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर करणार आहेत, भैरेवाड बोलताना म्हणाले की येणाऱ्या काळात सामाजिक राजकीय कार्यासाठी मी नेहमीच तत्पर आहे माझ्याकडे तालुका अध्यक्ष पदांची जबाबदारी संपूर्णपणे न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत राहणार पोलीस मित्र सदस्यांना कोणत्याही विषयावर अडचण आली तर मी तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल आहे असे प्रतिपादन केले.

त्याचबरोबर बिनविरोध निवडीमुळे पोलीस मित्र संघ एकजूट राहण्यास मदत होते असे यावेळी आवर्जून सांगितले पोलीस मित्र महाराष्ट्र जनसंपर्क प्रमुख अंकुश मेटकरी सांगितले आहे तालुक्यातील पोलीस मित्र यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पोलीस मित्र जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव पतंगे यांनी केले.

## युवा संस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ राऊत यांना कुणबी समाज भुषण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : कुणबी एकीकरण समिती महाराष्ट्र राज्य व जिजाऊ संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने कोकणातील कुणबी समाजातील विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा कुणबी समाज भूषण पुरस्कार देण्यात आले.



सोमनाथ राऊत ठाणे जिल्ह्यातील कल्याण, मुरबाड, शहापूर तालुक्यात शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक विषयावर काम करत असलेल्या सोमनाथ राऊत यांना जिजाऊ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश साबरे, तर विशेष मान्यवरांच्या उपस्थितीत कुणबी यांना समाज भूषण पुरस्कारने दिनांक २९ सप्टेंबर २०२४ रोजी सन्मानित करण्यात आले. कुणबी एकीकरण समिती महाराष्ट्र व राज्य व जिजाऊ संघटना महाराष्ट्र राज्य तर्फे कुणबी समाज भूषण पुरस्कार ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात गेल्या १५ वर्षा पासुन आदिवासी पाड्यात सर्वांगीण विकासासाठी काम करत आहे. आदिवासी पाड्यात नशेचे प्रमाण वाढत असल्याने यासाठी सोमनाथ राऊत सातत्याने विविध पातळीवर जनजागृतीचे काम करत आहे. म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन युवा संस्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ राऊत यांना कुणबी समाज भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून या उपक्रमांचे यशस्वी आयोजन
### विद्यार्थी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्तपणे सहभाग

# स्वेरीकडून 'स्वच्छता ही सेवा' या मोहिमेअंतर्गत विविध उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

> **सिव्हील इंजिनिअरींग विभागातील सुमारे १२० विद्यार्थ्यांनी दि. २६ सप्टेंबर रोजी विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरामध्ये स्वच्छता केली. दि. २८ सप्टेंबर रोजी स्वेरीतील सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी भारत पेट्रोलियमच्या स्वच्छता अभियाना अंतर्गत पुंडलिक मंदिर परिसर आणि चंद्रभागा नदी किनारा या परिसरात उत्स्फुर्तपणे स्वच्छता मोहीम राबविली.**

पंढरपूर: युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या निर्देशानुसार 'स्वभाव स्वच्छता- संस्कार स्वच्छता' या घोषवाक्यासह दि. १७ सप्टेंबर, २०२४ ते दि. १ ऑक्टोंबर २०२४ या कालावधीत 'स्वच्छता ही सेवा' या मोहिमेंतर्गत स्वच्छता विषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत कळवण्यात आले होते. त्या अनुषंगाने स्वेरीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून दि. २३ सप्टेंबर २०२४ ते २९ सप्टेंबर २०२४ या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये स्वेरीतील विद्यार्थ्यांनी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाकडून स्वच्छता विषयक विविध कार्यक्रम राबविण्यात आले. दि. २३ सप्टेंबर रोजी स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाकडून गोपाळपूर येथे 'स्वच्छता रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. या रॅली मध्ये सुमारे २०० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या रॅलीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी गोपाळपूर चौक पासून म्हाडा कॉलनी, मातोश्री वृद्धाश्रम, छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गे गोपाळकृष्ण मंदिर परिसरात स्वच्छतेविषयी जनजागृती केली तसेच शाळा, धार्मिक स्थळे, बस स्थानक, गाव चावडी, मुख्य चौक, बाजार, चाळ आदी वर्दळीच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्याचे नागरिकांना आवाहन केले. इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागाकडून दि. २४ सप्टेंबर रोजी गोपालकृष्ण मंदिर परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबवण्यात आले. सदर उपक्रमात इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग विभागातील सुमारे ९० विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. दि. २५ सप्टेंबर रोजी स्वेरीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअरींग या विभागातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी चौक आणि विठ्ठल मंदिर परिसरामध्ये स्वच्छता विषयक पथनाट्य सादर करून जनजागृती केली. या उपक्रमासाठी विभागातील सुमारे १६० विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. स्वेरीतील सिव्हील इंजिनिअरींग, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरींग तसेच एमबीए आणि एमसीए च्या सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी या स्वच्छता विषयक मोहिमेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दि. २९ सप्टेंबर रोजी स्वेरीच्या एमबीए आणि एमसीए विभागाच्या सुमारे २०० विद्यार्थ्यांनी रेल्वे स्टेशन परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबविली. या सर्व स्वच्छता विषयक उपक्रमांमध्ये स्वेरीतील सुमारे ५० प्राध्यापकांनीही सहभाग घेतला. 'स्वच्छता ही सेवा' या मोहिमेंतर्गत महाविद्यालयामध्ये देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि. २४ सप्टेंबर रोजी संस्थेमध्ये प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय आणि राजयोग शिक्षण आणि संशोधन केंद्र यांच्या सहयोगाने 'निसर्ग, पर्यावरण आणि आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमासाठी स्वेरीतील सुमारे ४००० विद्यार्थी व सुमारे ३०० शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय दि. २८ व २९ सप्टेंबर रोजी स्वच्छता विषयक निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वसतिगृहांमध्ये 'क्लीन रूम' स्पर्धा आदी उपक्रम आयोजित करण्यात आले होते. संस्थेचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे व कॅम्पस इनचार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच सर्व विभागांचे विभागप्रमुख डॉ. एस. बी. भोसले, डॉ. एस. पी. पवार, डॉ. एस. पी. पाटील, डॉ. दिप्ती तंबोळी, डॉ. यशपाल खेडकर, डॉ. सुमंत आनंद, डॉ. के. पी. गलानी, प्रा. एम.वाय शेख, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एम. आवताडे, डॉ. डी. एस. चौधरी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वेरीच्या विविध विभागातील सर्व समन्वयक प्रा. के.पी. पुकाळे, प्रा. एस.डी.माळी, प्रा. जी. जी. फलमारी, प्रा. एम.ए. सोनटक्के, प्रा. एस. बी. खडके, प्रा. बी.टी. गडदे, प्रा. व्ही.टी. भानवसे, प्रा. एस. डी. इंदलकर, प्रा. एस. एम. शिंदे यांच्या सहयोगातून 'स्वच्छता ही सेवा' या मोहिमेंतर्गत स्वच्छता विषयक सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पडले.



## थोडक्यात

### गरजू मुलींच्या शिक्षणाचा खर्च करणार : सुषमा चोरडिया

सोलापूर : सूर्यदत्त कॉलेज ऑफ नर्सिंग विद्यार्थ्यांना नर्सिंगच्या क्षेत्रात उच्च दर्जाचे शिक्षण आणि व्यापक प्रशिक्षण देण्यासाठी नव्याने पुढे आले आहे.नर्सिंग क्षेत्रात कुशल आणि तज्ज्ञ व्यावसायिक निर्माण करणे,या उद्देशाने ही संस्था सुरु करण्यात आली आहे.या महाविद्यालयाने अत्याधुनिक शिक्षण तंत्र,वैद्यकीय सुविधा,आणि प्रत्मक्ष अनुभव यांचा संगम साधून विद्यार्थ्यांसाठी आदर्श व्यासपीठ उभारले असून,गरजू मुलींच्या शिक्षणाचा खर्च सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्युट करणार आहे,परंतु राहण्याचा आणि खाण्याचा खर्च प्रत्मक्ष स्मृतः विधार्थिनींना करावा लागेल.असे सूर्यदत्त एज्युकेशन फाऊंडेशनचे उपाध्यक्ष सुषमा चोरडिया यांनी बोलताना सांगितले.प्रवेश प्रक्रियेची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर आहे आणि अर्ज स्वीकारण्याची तारीख १० ऑक्टोबर असेल.तर अधिक माहितीसाठी www. scnpst.org/ या संकेतस्थळावर,व ७७७६०७२०००,८९५६९३२४०० किंवा ८९५६३६०३६० या क्रमांकावर संपर्क साधावा,असे आवाहन संस्थेच्या सहयोगी उपाध्यक्षा डॉ.किमया गांधी यांनी केले.

### विकासाला चालना देण्यासाठी ॲमेझॉन वचनबद्ध

सोलापूर : महाराष्ट्रातील आणि भारतभरातील विक्रेत्यांसाठी २०२४ चा सणासुदीचा काळ यशस्वी बनविण्यासाठी मेझॉनने विविध उपक्रम आणि नावीन्यपूर्ण कल्पना सादर केल्या आहेत.मेझॉनने विक्रेत्यांना त्यांच्या उत्पन्नात वाढ करायला मदत आणि ग्राहकांना अधिक चांगल्या किमतीत वस्तू सादर करता येण्यासाठी ३% ते १२% दरम्यान विक्री शुल्कात मोठी कपात जाहीर केली आहे.सणासुदीचा काळ हा महाराष्ट्रातील लघू आणि मध्यम उद्योगांसाठी ई-कॉमर्सद्वारे त्यांचा ऑनलाइन व्यवसाय वाढविण्याची मोठी संधी आहे.अमित नंदा म्हणाले,मेझॉनमध्ये आम्ही महाराष्ट्रातील लघू आणि मध्यम उद्योगांना ई-कॉमर्सच्या फायद्यांचा लाभ घेण्यास मदत करून त्यांना सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहोत.विक्री शुल्कात झालेली कपात,तसेच आम्ही सादर केलेले इतर उपाय आणि वैशिष्ट्ये विक्रेत्यांना सणासुदीच्या काळात व त्यानंतरही अभूतपूर्व यश मिळवून देतील,याची आम्हाला खात्री आहे.

### ४ ऑक्टोबरला रंगणार एक डाव भुताचा

सोलापूर : स्मशानात जन्म झाल्यामुळे सतत भूत दिसणाऱ्या तरूण आणि मुक्ती मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेलं भूत यांच्यातील धमाल गोष्ट 'एक डाव भूताचा' या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. सिद्धार्थ जाधव,मकरंद अनासपूरे प्रमुख भूमिकेत असलेला हा चित्रपट येत्या शुक्रवारी ४ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे.रेवा इलेक्ट्रॉनिक्स या निर्मिती संस्थेने एक डाव भूताचा या चित्रपटाची निर्मिती केली असून प्रस्तुती अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेन्मेंटने केली आहे.चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन संदीप मनोहर नवरे यांनी केलं आहे.

# अंढेरा मंडळ अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत

## परीसरावर कोरड्या दुष्काळाचे संकट! धरणे अजून हि कोरडीच




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

देऊळगाव राजा /दिलीप वनवे

ऑक्टोबर महिना आता सुरु झाला आहे व पावसाळा आता संपल्यात च जमा आहे, मात्र अंढेरा महसूल मंडळ यंदा कोरड्या

**खडकपूर्णा तील पाणी सोडण्याच्या उपाययोजनेकडे नागरिकांची आस**

दुष्काळाच्या गडद छायेखाली दिसून येत आहे.कारण या वर्षी अंढेरा, बायगाव बु., शिवणी आरमाळ, पाडळी शिंदे,सुरा, सरंबा नागनगाव,मेंडगाव,सावखेड नागरे या परिसरात अत्यंत अल्प पाऊस झालेला आहे.अंढेरा परिसरातील रामेश्वर धरण मेंडगाव येथील तलाव आणि परिसरातील जीवन दायीनी असलेले शिवणी आरमाळ धरण अजूनही पूर्णतः कोरडे आहेत त्यामध्ये फक्त मृत जलसाठाच शिल्लक आहे. त्यामुळे या परिसरावर कोरड्या दुष्काळाचे गडद सावट गोंगावत आहे. तुरळक पावसाने या परिसरातील खरीप हंगागामा तील पिके कसेबसे आलेले असून यापुढे पाऊस झाला नाही तर रब्बी हंगाम तर सोडाच पण पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुद्धा या परिसरामध्ये फार गंभीर होणार आहे.महाराष्ट्र मध्ये सगळीकडे चांगल्या प्रकारचा पाऊस यावर्षी पडलेला आहे मात्र अंढेरा परिसरामध्ये पावसाने खूप डोळे झाक केलेली आहे म्हणजेच अगदी पाठ फिरवली म्हटलं तर वावगे ठरणार नाही.पावसाळा संपत आलेला असून धरणां मधला मृत जलसाठा हा फार चिंतेचा विषय या परिसरातील नागरिकांसाठी आहे. परतीच्या पावसाची तेवढीच अपेक्षा या परिसरातील नागरिकांना शिल्लक आहे आणि परतीच्या पावसात जर पावसाने असा दगा दिला तर मात्र परिसरातील स्थिती फार गंभीर होण्याची चिन्ह दिसू लागली आहे.जंगलातील वन्य प्राण्यांचा पाण्याचा प्रश्न, गुरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोबतच परिसरातील गावांमध्ये नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न फार गंभीर होण्याची चिन्ह दिसून येत आहे. त्यामुळे खडकपूर्णा धरणातील पाणी शिवणी आरमाळ धरणात व परिसरातील छोट्या छोट्या तलावांमध्ये सोडण्यात यावे अशी मागणी आता परिसरातील नागरिकांमध्ये मध्ये जोर धरू लागली आहे.

यंदा अंढेरा सह परिसरातील गावांमध्ये यंदा अगदी अत्यल्प प्रमाणात पाऊस झाला आहे आणि परतीचा पाऊस समाधान कारक झाला नाही तर भविष्यात पाण्याची स्थिती फारच गंभीर होऊ शकते. त्यामुळे शासनाने अंढेरा मंडळात कोरडा दुष्काळ जाहीर करून योग्य त्या उपाययोजना तातडीने कराव्यात.

**– श्री.दिपक शिवाजी नागरे (बायगांव बु.)**

यंदा आमच्या बायगाव बु परिसरात सरासरी पेक्षा खूपच कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे भविष्यात पाणी प्रश्न गंभीर होणार आहे त्यामुळे शासनाने या परिस्थिती कडे तात्काळ लक्ष देऊन लवकरात लवकर उपाययोजनेची गरज आहे.

## वंचित बहुजन आघाडीच्या जनसंवाद यात्रेला अक्कलकोट तालुक्यातील जनतेचा भरघोस प्रतिसाद



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी)- अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीच्या वतीने ८ सप्टेंबर पासून संपूर्ण तालुक्यात जनसंवाद यात्रा काढण्यात आला होता त्याला अक्कलकोटच्या जनतेकडून भरघोस असा प्रतिसाद मिळाला.

ओबीसी समाजापर्यंत आरक्षणाचा महत्त्व आणि एससी एसटी आरक्षण विरोधात सुप्रीम कोर्टाचा १ ऑगस्ट २०२४ ला जो निर्णय आला त्याबद्दलची जनजागृती करण्यासाठी आणि आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्या साठी या जनसंवाद यात्रेचा आयोजन वंचित बहुजन आघाडी अक्कलकोटच्या वतीने करण्यात आला होता आठ तारखेपासून गोसावी वस्ती, सांगवी ,शिरसी, शिरवळ ,वागदरी ,भूरी कवटा, किरनळी , बदोला,कीणी, काझीकनबस, कुरनूर ,चुंगी ,हन्नूर, बराणपुर ,चपळगाव, अक्कलकोट स्टेशन ,शावळ, कर्जाळ ,कोन्हाली, हंजगी ,बॅगेहळी ,कडबगाव, दोड्याळ ,जेऊर ,हांद्राळ ,मुंडेवाडी, कुडल ,देवी कवठा ,बासलेगाव, कलप्पावाडी ,कंटेहळी ,बोरी उमरगे, मिरजगी, दुधनी ,सिन्नर ,नागुर, इब्रामपूर ,मुगळी ,संगोळगी, बनजगोळ, निमगाव ,गौडगाव, हत्ती कणबास, चिकेहली, इत्यादी गावात फटाके फोडून ढोल ताशा लावून जनतेने या जनसंवाद यात्रेचा स्वागत करण्यात आला.

हा पहिला टप्पा असून दुसऱ्या टप्प्यात राहिलेले गाव पूर्ण करणार असून आरक्षण आपल्या हक्काचा आहे तो संपवण्याचा षडयंत्र सध्या चालू असून याबाबत जनजागृती या जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून करण्यात आली ८ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर २०२४ पर्यंत गेले २० दिवस हा जनसंवाद यात्रा सारखा पाऊस चालू असताना सुद्धा हा यात्रा सुरू होता पहिला टप्पा यशस्वी रित्या पार पडला, या जन संवाद यात्रेच्या माध्यमातून जनते सोबत एससी, एसटी आणि ओबीसी आरक्षणाच्या बाबतीत अतिशय महत्त्वाचा संवाद साधण्यात आला एस सी, एस टी च्या आरक्षणामध्ये सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून वर्गीकरण करून आणि क्रिमिलियर लावून कुटुंबातल्या एकाच व्यक्तीला यापुढे आरक्षण घेता येईल अशा पद्धतीचे अट सुप्रीम कोर्टाने घातल्यामुळे एससी एसटी चा आरक्षण संपविण्याचा षडयंत्र देशात आणि राज्यात आज चालू आहे या गोष्टीला ना सत्ताधाऱ्यांचा विरोध आहे ना विरोधकांचा विरोध आहे दोघेही मूग गिळून गप्प बसलेले आहे त्यामुळे ही जनसंवाद यात्रा काढावी लागली असे पत्रकारांशी बोलताना सोलापूर वंचित बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे यांनी सांगितले, गरीब मराठ्यांना वेगळं आरक्षण द्या ओबीसींच ताट वेगळं आणि मराठा समाजाचा ताट वेगळा या दोघांना वेग वेगळ्या आरक्षण मिळाला पाहिजे अशी भूमिका प्रथम पासून आदरणीय बाळासाहेब आंबेडकर आणि वंचित बहुजन आघाडीची राहिलेली आहे परंतु सत्ताधारी आणि विरोधक हे दोघेही ओबीसीच्या आरक्षणा संदर्भात कोणीही वक्तव्य करायला तयार नाही त्यामुळे ओबीसीचा आरक्षण धोक्यात आलेला आहे याची जनजागृती या जनसंवाद यात्रेतून करण्यात आली.

हा जनसंवाद यशस्वी करण्यासाठी वंचित बहुजन आघाडी युवक तालुका अध्यक्ष शिलामणी बनसोडे, माथाडी कामगार जिल्हाध्यक्ष ज्योतिर्लिंग स्वामी, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ते रविराज पोटे, माथाडी कामगार तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे, शहराध्यक्ष विशाल ठोंबरे तालुका महासचिव नागेश हरवाळकर जिल्हा संघटक देवानंद अस्वले युवक जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश शिंदे, गंगाराम गायकवाड, युवक आघाडी तालुका उपाध्यक्ष संकेत शिरसे, सोमनाथ दसाडे,चिदानंद गाडेकर, युवक कार्यकर्ता गंगाराम वाघमारे, शहर उपाध्यक्ष सुनील शिंगे, महासचिव भारत देडे, तालुका संघटक बबन गायकवाड शहर युवक अध्यक्ष संदीप बाळशंकर, शहर उपाध्यक्ष शिवाजी चौगुले, देविदास नडगम, भीम मडीखांबे, योगेश सोनकांबळे आनंद सोनकांबळे,शिवा नाटिकर, तालुका महासचिव गौतम गायकवाड तालुका उपाध्यक्ष नरसिंह गायकवाड, रतन इंगळे आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## दबंग पोलीस अधिकारी राजकुमार डूनगे यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर शहरात पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रचालविणारा युवक राहूल अशोक चव्हाण यांचे वरती सोमवार दिनांक ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास इंदापूर महाविद्यालयासमोर असताना, पाठीमागून येऊन गावठी पिस्तुलाच्या सहाय्याने चार गोळ्या झाडल्यानंतर आरोपी इसम फरार झाला होता.

पाच राउंड फायर करून खुनाचा प्रयत्न करणाऱ्या गुन्हेगाराला एक तासाच्या आतमध्ये शिफायतीने अटक करणारे दबंग पोलीस अधिकारी श्री.राजकुमार डूनगे यांचे सर्वत्र कौतुक केले जात असुन पुढील वाटचालीस शुभकामना दिल्याजात आहेत.

## महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी दिलीप वनवे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा/राहुल साबळे : कलावंताचे हक्काचे अपेक्षित व्यासपीठ समजल्या जाणाऱ्या व कले बरोबरच कलावंतांचे हितसंवर्धन साधले जाणाऱ्या महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान महाराष्ट्र राज्य या संस्था संघटनेच्या बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष म्हणून माजी सरपंच पत्रकार श्री दिलीप वनवे यांची निवड एका पत्रकान्वये संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष श्री मल्हारी खेडकर यांनी नुकतीच नियुक्ती केली आहे.



महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान या संस्थेमध्ये सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,कला,साहित्य,क्रीडा, धार्मिक,आदी क्षेत्रांमध्ये सक्रिय सहभाग असलेल्या तसेच उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींची पदाधिकारी म्हणून निवड केली जाते.

महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानचे राज्य कार्याध्यक्ष श्री मल्हारी खेडकर यांनी नवनियुक्त बुलढाणा जिल्हाध्यक्ष म्हणून श्री दिलीप वनवे यांची नियुक्ती त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन केलेली आहे.

महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष श्री दिलीप वनवे हे मागील ५ वर्षे बायगांव बु. येथील ग्रामपंचायत चे उपसरपंच तसेच २ वर्षे ग्रामपंचायत सरपंच म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे.तसेच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांच्या पत्नी कार्यरत आहेत. तसेच ग्राहक उपभोक्ता समितीचे बुलढाणा जिल्हा प्रसिद्धीप्रमुख म्हणून काम पाहिलेले आणि पत्रकारितेच्या माध्यमातून लोंकाच्या सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या तसेच गावातील गणेशोत्सव व दुर्गा देवी तसेच गावातील पारंपरिक सोंग यामध्ये सक्रिय सहभाग घेऊन तसेच उपेक्षित कलावंताना अपेक्षित प्रोत्साहन देण्याचे काम करणारे श्री.दिलीप वनवे यांना महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान महाराष्ट्र राज्य या कलावंतांच्या संस्था संघटनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष म्हणून नवीन जबाबदारी महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान या संस्था संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष श्री मल्हारी खेडकर यांनी दिली आहे.

महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियान संस्था संघटनेच्या माध्यमातून बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील विविध कला क्षेत्रातील कार्य करणारे बंधू-भगिनींना संघटित करून नवोदित व जुन्या कलावंतांना विचारात घेऊन लवकरच जिल्हा व सर्व तालुका कार्यकारण्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी करणार आहे.तसेच उपेक्षित कलावंतांना अपेक्षित हक्काचे व्यासपीठ निर्माण करून देऊन , आज कलावंतांचे हित संवर्धन साधण्यासाठी नवीन व जुने तसेच प्रौढ कलावंत बंधू-भगिनींना महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानच्या माध्यमातून त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी व त्यांच्या न्याय हक्कासाठी सदैव सनदशीर मार्गाने कार्यरत राहून बुलढाणा जिल्ह्यामध्ये कलावंतांच्या साठीची मोठी चळवळ महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानचे राज्य कार्याध्यक्ष श्री मल्हारी खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उभी करणार असल्याचे नवनिर्वाचित बुलढाणा जिल्हाध्यक्ष श्री दिलीप वनवे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्रसांस्कृतिककलाअभियानमध्ये लेखक,कवी, साहित्यिक,व्यंगचित्रकार, चित्रकार,नकलाकार,कीर्तनकार, प्रवचनकार, कथाकार, रामायणचार्यकार, गायक, वादक, पार्श्वगायक, मृदुंगाचार्य, भजनी, टाळकरी, माळकरी,हार्मोनियम वादक, ढोलकी वादक, तबलावादक शाहीर, पोवाडे गायक, एकतारी भजन, पोथीवाचक , गौळण गायक, काकडा आरती,पोथीवाचक सूचक, भारूडकार,वाघे,नृत्य कलावंत, नाट्य कलावंत, अभिनय कलावंत, वेशभूषाकार,केशभूषाकर आदी आदी सर्व कलाक्षेत्रातील स्त्री पुरुष कलावंतांना संघटित करण्यात येणार असल्याचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष श्री दिलीप वनवे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानचे राज्य कार्याध्यक्ष श्री मल्हारी खेडकर यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त कलावंत बंधू भगिनींना संघटनेच्या माध्यमातून न्याय देण्याचे काम करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष श्री दिलीप वनवे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानचे प्रदेशाध्यक्ष श्री सुरेशचंद्र आहेर, प्रदेशसरचिटणीस श्री अशोक भालेराव, राज्य कार्याध्यक्ष श्री मल्हारी खेडकर यांनी नवनिर्वाचित बुलढाणा जिल्हाध्यक्ष श्री दिलीप वनवे यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

## भारतीय जनता पक्षाचे उत्तर भारतीय सेल उल्हासनगर शहर अध्यक्ष संजय गुप्ता यांचे वंचित बहुजन आघाडी मध्येजाहीर प्रवेश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी /बाळासाहेब अहिरे : दि २९-०९-२४ रोजी वंचित बहुजन आघाडी उल्हासनगर शहर (प) वतीने उल्हासनगर मधील सिंधु भवन या ठिकाणी मोठ्या प्रमाणात सत्ता निर्धार मेळावा व जाहीर पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी भाजपा उत्तर भारतीय सेल चे जिल्हा अध्यक्ष संजयजी गुप्ता व त्यांच्या सोबत शेकडो उत्तर भारतीय कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीला सोडचिठ्ठी देऊन वंचित बहुजन आघाडीमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर यांच्या हस्ते जाहीर पक्षप्रवेश केला.यावेळी प्रामुख्याने वंचित बहुजन आघाडीचे राज्य कमिटीचे सदस्य महेश भारतीय उल्हासनगर शहर पश्चिम चे अध्यक्ष उज्वल महाले, उल्हासनगर महिला आघाडी शहर अध्यक्ष रेखाताई उबाळे,महिला आघाडीच्या माजी जिल्हा अध्यक्ष मायाताई कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष विजय गायकवाड,सम्यक विद्यार्थी आंदोलन चे राज्य प्रवक्ते इंजि.रूपेश हुंबरे , उल्हासनगर पूर्व अध्यक्ष शेषराव वाघमारे ,शहर युवा आघाडी अध्यक्ष भरत रणदिवे व सर्व शहराचे अध्यक्ष तसेच वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी, युवा आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलन व भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**माहिती अधिकार याबाबत जिल्हा विकास यंत्रणा कार्यालयात झाली कार्यशाळा** **प्रकल्प संचालक डॉ.सुधीर ठोंबरे**

# अर्ज आला की शासकीय माहिती तात्काळ द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : माहिती अधिकार कायदा अधिनियम २००५ अन्वये नागरिकांना आवश्यक असणारी माहिती देणे बंधनकारक असून त्याचे पालन सर्वांनी करावे, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ.सुधीर ठोंबरे यांनी केले.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सोलापूर येथे माहिती अधिकार संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रमध्ये प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे बोलत होते.




यावेळी सहाय्यक प्रकल्प अधिकारी रतिलाल साळुंखे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, कार्यालयीन अधिक्षक सीमा लोखंडे, विस्तार अधिकारी प्रणोती सराफ आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी चर्चासत्रात पुढे बोलताना प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी माहिती अधिकार याविषयी मार्गदर्शन करताना माहिती अधिकार म्हणजे कोणत्याही शासकीय निमशासकीय अनुदानित कार्यालयाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेली व या नियमानुसार मिळवता येण्याजोगी माहिती तसेच आवश्यक अशी माहिती जाणून घेणे, त्याची कागदपत्रे मिळवणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क असून तो मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे माहिती अधिकारासाठी एखाद्या नागरिकाने मागणी केली असता ती अगदी विहित वेळेत कुठल्याही प्रकारची तसदी न बाळगता अचूक माहिती पुरवणे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे.

तसेच त्यांनी माहिती अधिकाराचे नियम, त्याबद्दलचे फायदे- तोटे याबाबत मार्गदर्शन केले.तसेच प्रत्येक कर्मचारी, अधिकारी यांना माहिती अधिकार याविषयी सजग राहून मागणी करणाऱ्या प्रत्येक नागरिकांना सहकार्य करावे, असे आवाहन केले.